# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18

## अ प्रभाग समिती

## सभावृत्तांत [ कार्यपत्रिका क्रमांक 7 ]

**दिनांक : 15/12/2017** **वेळ : सकाळी 11.30 वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे डिसेंबर 2017 ची मासिक सभा शनिवार दिनांक 15/12/2017 रोजी सकाळी 11.30 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. केशव हनुमंत घोळवे | सभापती |
| 2. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सदस्या |
| 3. | मा. प्रमोद कुटें | सदस्य |
| 4. | मा. राजू मिसाळ | सदस्य |
| 5. | मा. बाबर शर्मिला राजू | सदस्या |
| 6. | मा. अमित राजेंद्र गावडे | सदस्य |
| 7. | मा. जयश्री वसंत गावडे | सदस्या |
| 8. | मा. कोमल दिपक मेवानी | सदस्या |

याशिवाय श्रीम. आशादेवी दुरगुडे – मा. क्षेत्रीय अधिकारी, श्री. विशाल कांबळे - कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, श्री. सतिश इंगळे – मा.कार्यकारी अभियंता, स्थापत्य, श्री संजय खाबडे – मा. कार्यकारी अभियंता, विद्युत, श्री. आर.के.लटपटे – प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री. अनिल शिंदे श्री संजय काशीद, श्री. सुभाष काळे, श्री. कोल्हे एल.पी., श्री.चंद्रकांत मुठाळ, श्री. व्ही.के. जाधव, श्री एम.आय. खोंद्रे, – उपअभियंता, श्री. महादेव शिंदे – सहा. आरोग्याधिकारी, श्री कदम पी.जे. – लेखाधिकारी, श्रीम. साळुंके अस्मिता - कनिष्ठ अभियंता, स्था.उदयान, श्री पाटील एस.पी. कनिष्ठ अभियंता – स्थापत्य, श्री अनिल हरिश्चंद्रे – सहा. उदयान निरीक्षक, श्री डी.जी. कांबळे – उदयान सहाय्यक इ. अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

सर्वप्रथम मा. सभापती, श्री. केशव हनुमंत घोळवे यांनी उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, नगरसदस्या तसेच अधिकारी यांचे स्वागत केले. तदनंतर मा. आमदार – श्री लक्ष्मण जगताप यांच्या मातोश्रींचे तसेच प्रख्यात ज्येष्ठ अभिनेते शशी कपूर यांचे नुकतेच निधन झाल्याने सभागृहामध्ये दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली.

त्यानंतर मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांनी दि. 22/11/2017 रोजीचा सभावृत्तांत कायम केल्याचे जाहीर करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

मा. सभापती यांचे संमतीने खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

विषय क्रमांक 3 :- मा.सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 15/12/2017 रोजीचा प्रस्ताव प्रभाग क्रमांक 10 मधील शाहूनगर व संभाजीनगर येथे महिला व पुरुष शौचालय बांधणे.

विषय क्रमांक 4 :- मा.सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 15/12/2017 रोजीचा प्रस्ताव प्रभाग क्रमांक 10 मधील शाहूनगर येथे महानगरपालिकेच्या व्यापारी गाळयांसमोर कारंजे बसविणे.

विषय क्रमांक 5 :- मा.सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 15/12/2017 रोजीचा प्रस्ताव
प्रभाग क्रमांक 10 मधील शाहूनगर येथे महानगरपालिकेच्या व्यापारी गाळयांसमोर व परिसरामध्ये एल.ई.डी. बसविणे.

विषय क्रमांक 6 :- मा.सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 15/12/2017 रोजीचा प्रस्ताव
प्रभाग क्रमांक 10 मधील शाहूनगर येथे महानगरपालिकेच्या व्यापारी गाळयांसमोर व परिसरामध्ये बेंचेस बसविणे तसेच व्यापारी गाळयांची दुरुस्ती व पेंटींग करणे.

विषय क्रमांक 7 :- मा.सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 15/12/2017 रोजीचा प्रस्ताव
प्रभाग क्रमांक 10 मधील शाहूनगर येथे महानगरपालिकेच्या व्यापारी गाळयांसमोर व परिसरामध्ये फुलझाडे लावणे व लँडस्केपींग करणे.

विषय क्रमांक 8 :- मा.सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 15/12/2017 रोजीचा प्रस्ताव
प्रभाग क्रमांक 10 मधील शिवशाहू उदयानामध्ये ज्येष्ठ नागरीकांसाठी बेंचेस बसविणे.

विषय क्रमांक 9 :- मा.सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 15/12/2017 रोजीचा प्रस्ताव
प्रभाग क्रमांक 10 मधील शिवशाहू उदयानामधील मोकळया जागेमध्ये सर्वांसाठी ओपन जीमची निर्मिती करणे.

विषय क्रमांक 10 :- मा.सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 15/12/2017 रोजीचा प्रस्ताव
प्रभाग क्रमांक 10 मधील शाहूनगर मधील शिवशंभो चौक येथील तुटलेला डीव्हायडर दुरुस्त करणे.

विषय क्रमांक 11 :- मा.सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 15/12/2017 रोजीचा प्रस्ताव
अ प्रभाग हद्दीमधील सर्व E.T.P., S.T.P. प्लाँटस परिसरामध्ये घनकचरा डम्पींग करणे व मैलाशुध्दीकरण या ठिकाणी फॉगींग सिस्टीम बसविणे.

विषय क्रमांक 12 :- मा. उपमहापौर शैलजा मोरे यांचा दि. 15/12/2017 रोजीचा प्रस्ताव
प्रभाग क्रमांक 15 मध्ये सेक्टर नंबर 25 येथे आरोग्य कर्मचा-यांसाठी असलेले तात्पुरते कार्यालय अत्यंत जीर्ण झाले असून त्याठिकाणी एकूण 27 कर्मचारी कार्यरत आहेत. पावसाळयामध्ये या कर्मचा-यांची गैरसोय होत असल्याने त्या कार्यालयाशेजारी आरोग्य कर्मचा-यांसाठी तात्पुरत्या स्वरुपाचे पत्राशेड बांधणे.

विषय क्रमांक 13 :- सन्मा. सदस्य अमित गावडे यांचा दि. 15/12/2017 रोजीचा प्रस्ताव
प्रभाग क्रमांक 15 मधील स्वामी समर्थ उदयानामध्ये 7.7 मी 6.5 मी. या मापाचा स्टेज आहे. सदर स्टेज उदयानाच्या मध्यभागी असल्यामुळे उदयानात अडथळा ठरत आहे. सदरचा स्टेज पाडून उदयानाच्या एका बाजूला बांधणेस मान्यता देणे

विषय क्रमांक 14 :- सन्मा. सदस्या शर्मिला बाबर यांचा दि. 15/12/2017 रोजीचा प्रस्ताव
जुना प्रभाग क्रमांक 14 भक्तीशक्ती उदयान, निगडी गावठाण भागात जय ट्रेडर्सजवळ कमान उभारणेस व त्यास कै. बाबुराव दगडू काळभोर असे नाव देणेबाबतचा ठराव दि. 3/11/2016 रोजी झाला आहे. तसेच प्र.क्र. 15 मधील पांढारकर वस्ती, आकुर्डी येथील पंपिंग स्टेशन यास कै. पांडुरंग लक्ष्मण पांढरकर पंपिंग स्टेशन असे नामकरण करणेस मान्यता दिली होती. पण सदर ठिकाणी पंपिंग स्टेशन विभागून तेथे आता मैलाशुध्दीकरण केंद्र [ process plant ]

केलेले आहे. तरी त्याला पुन्हा कै. पांडुरंग लक्ष्मण पांढरकर शुध्दीकरण केंद्र हेच नाव देण्यात यावे.

विषय क्रमांक 15 :- अ क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र. अक्षेका/प्रशा/1/कावि/876/2017 दि. 12/12/2017

अ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रशासन विभागाकडील परिशिष्ठ ब मधील इमारत भाडे लेखाशिर्षावरील र.रु. 50,000/- मधून प्रवास भत्ता या लेखाशिर्षावर र.रु. 25,000/- तरतूद वर्ग करणेस मान्यता देणे.

वरील प्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेण्यात आले.

ठराव क्रमांक 137 — विषय क्रमांक 1
दिनांक 15/12/2017 — विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. प्रमोद कुटे — अनुमोदक : मा. राजू मिसाळ

संदर्भ :- सन्मा. सदस्य प्रमोद कुटे यांचा दि. 2/11/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 14 मधील विवेकनगर येथील बंद व खराब अवस्थेत असलेल्या सर्व्हे नंबर 4310 मध्ये असणारे शौचालय काढणेस मान्यता देणेत येत आहे .

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 138 — विषय क्रमांक 2
दिनांक 15/12/2017 — विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. प्रमोद कुटे — अनुमोदक : मा. राजू मिसाळ

संदर्भ :- सन्मा. सदस्य जावेद शेख यांचा दि. 4/12/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 14 मधील महापालिकेच्या नियोजित दवाखान्यासमोर [ आकुर्डीमेन रोड ते शुभश्री रेसि. ] परिसरात वाहतूक वाढली असून तेथे उभ्या असणा-या इतर वाहनांमुळे रहदारीस अडथळा होतो. तसेच भविष्यात दवाखाना सुरु झाल्यानंतरही या वाहनांमुळे अडचणीचे ठरणार आहे.तरी नियोजित दवाखान्यासमोर नो पार्कींग झोन करणेस मान्यता देणेत येत आहे .

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 139 — विषय क्रमांक 3
दिनांक 15/12/2017 — विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. अनुराधा गोरखे — अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा.सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 15/12/2017 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील शाहूनगर व संभाजीनगर येथे महिला व पुरुष शौचालय बांधणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 140 — विषय क्रमांक 4
दिनांक 15/12/2017 — विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. अनुराधा गोरखे — अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा.सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 15/12/2017 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील शाहूनगर येथे महानगरपालिकेच्या व्यापारी गाळयांसमोर कारंजे बसविणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 141 | विषय क्रमांक 5
दिनांक 15/12/2017 | विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. अनुराधा गोरखे | अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा.सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 15/12/2017 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील शाहूनगर येथे महानगरपालिकेच्या व्यापारी गाळयांसमोर व परिसरामध्ये एल.ई.डी. बसविणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 142 | विषय क्रमांक 6
दिनांक 15/12/2017 | विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. अनुराधा गोरखे | अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा.सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 15/12/2017 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील शाहूनगर येथे महानगरपालिकेच्या व्यापारी गाळयांसमोर व परिसरामध्ये बेंचेस बसविणेस तसेच व्यापारी गाळयांची दुरुस्ती व पेंटींग करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 143 | विषय क्रमांक 7
दिनांक 15/12/2017 | विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. अनुराधा गोरखे | अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा.सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 15/12/2017 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील शाहूनगर येथे महानगरपालिकेच्या व्यापारी गाळयांसमोर व परिसरामध्ये फुलझाडे लावणेस व लँडस्केपींग करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 144 | विषय क्रमांक 8
दिनांक 15/12/2017 | विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. अनुराधा गोरखे | अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा.सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 15/12/2017 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील शिवशाहू उदयानामध्ये ज्येष्ठ नागरीकांसाठी बेंचेस बसविणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 145 विषय क्रमांक 9
दिनांक 15/12/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा.सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 15/12/2017 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील शिवशाहू उदयानामधील मोकळया जागेमध्ये सर्वांसाठी ओपन जीमची निर्मिती करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 146 विषय क्रमांक 10
दिनांक 15/12/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा.सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 15/12/2017 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील शाहूनगर मधील शिवशंभो चौक येथील तुटलेला डीव्हायडर दुरुस्त करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 147 विषय क्रमांक 11
दिनांक 15/12/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा.सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 15/12/2017 रोजीचा प्रस्ताव

अ प्रभाग हद्दीमधील सर्व E.T.P., S.T.P. प्लॉटस परिसरामध्ये घनकचरा डम्पींग करणेस व मैलाशुध्दीकरण या ठिकाणी फॉगींग सिस्टीम बसविणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 148 विषय क्रमांक 12
दिनांक 15/12/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. उपमहापौर शैलजा मोरे यांचा दि. 15/12/2017 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 15 मध्ये सेक्टर नंबर 25 येथे आरोग्य कर्मचा-यांसाठी तात्पुरते कार्यालय होते ते अत्यंत जीर्ण झाले असून त्याठिकाणी एकूण 27 कर्मचारी कार्यरत आहेत. पावसाळयामध्ये या कर्मचा-यांची गैरसोय होत असल्याने त्या कार्यालयाशेजारी आरोग्य कर्मचा-यांसाठी तात्पुरत्या स्वरुपाचे पत्राशेड बांधणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 149 विषय क्रमांक 13
दिनांक 15/12/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. अमित गावडे अनुमोदक : मा. राजू मिसाळ

संदर्भ :- सन्मा. सदस्य अमित गावडे यांचा दि. 15/12/2017 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 15 मधील स्वामी समर्थ उदयानामध्ये 7.7 मी 6.5 मी. या मापाचा स्टेज आहे. सदर स्टेज उदयानाच्या मध्यभागी असल्यामुळे उदयानात अडथळा ठरत आहे. सदरचा स्टेज पाडून उदयानाच्या एका बाजूला बांधणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 150 — विषय क्रमांक 14

दिनांक 15/12/2017 — विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा. शर्मिला बाबर — अनुमोदक : मा. अनुराधा गोरखे

संदर्भ :- सन्मा. सदस्या शर्मिला बाबर यांचा दि. 14/12/2017 रोजीचा प्रस्ताव

जुना प्रभाग क्रमांक 14 भक्तीशक्ती उदयान, निगडी गावठाण भागात जय ट्रेडर्सजवळ कमान उभारणेस व त्यास कै. बाबुराव दगडू काळभोर असे नाव देणेबाबतचा ठराव दि. 3/11/2016 रोजी झाला आहे. तसेच प्र.क्र. 15 मधील पांढारकर वस्ती, आकुर्डी येथील पंपिंग स्टेशन यास कै. पांडुरंग लक्ष्मण पांढरकर पंपिंग स्टेशन असे नामकरण करणेस मान्यता दिली होती. पण सदर ठिकाणी पंपिंग स्टेशन विभागून तेथे आता मैलाशुध्दीकरण केंद्र [ process plant ] केलेले आहे. तरी त्याला पुन्हा कै. पांडुरंग लक्ष्मण पांढरकर शुध्दीकरण केंद्र हेच नाव देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 151 — विषय क्रमांक 15

दिनांक 15/12/2017 — विभाग : प्रशासन, अ क्षेत्रीय

सुचक: मा. अमित गावडे — अनुमोदक : मा. राजू मिसाळ

संदर्भ :- अ क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र. अक्षेका/प्रशा/1/कावि/876/2017 दि. 12/12/2017

अ क्षेत्रीय कार्यालयातील श्रीम आशादेवी मारुती दुरगुडे, क्षेत्रीय अधिकारी यांचे प्रवासभत्ता बील र.रु. 14,236/- प्रवासभत्ता या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेत येते. सदर लेखाशिर्षावर सन 2017-18 या आर्थिक वर्षामध्ये र.रु. 6,000/- इतकी तरतूद करणेत आलेली असून र.रु. 14,236/-इतका खर्च झालेला आहे. सदर प्रवास भत्ता या लेखाशिर्षावरील तरतूद खालीलप्रमाणे वर्ग करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्षाचे नांव | सन 2017-18 ची तरतूद | दि. 30/9/2017 अखेर झालेला खर्च | त्यावरील शिल्लक तरतूद | ज्या लेखाशिर्षावरुन तरतूद वर्ग करावयाची ते लेखाशिर्ष इमारत भाडे | वर्ग करावयाची तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रवास भत्ता | 6,000/- | 0 | 6,000/- | 50,000/- | 25,000/- |

तरी अ क्षेत्रीय कार्यालय प्रशासन विभागाकडील परिशिष्ठ ब मधील इमारत भाडे लेखाशिर्षावरील र.रु. 50.000/- मधून प्रवास भत्ता या लेखाशिर्षावर र.रु. 25,000/- तरतूद महापालिका अधिनियम मधील कलम 103 अनुसूची प्रकरण 7 [2] नुसार वर्ग करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झालेनंतर उपस्थित सन्मा. सदस्यांनी त्यांचे वॉर्डामधील/ प्रभागामधील अडी-अडचणींबाबत खालीलप्रमाणे उपस्थित केलेल्या मुद्दयांचे अनुषंगाने मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांनी सर्व संबंधित अधिकारी यांना खालील प्रमाणे सुचना दिल्या.

- सन्मा. सदस्या जयश्री गावडे व शर्मिला बाबर यांनी प्रभागामधील मोकाट जनावरे, कुत्री, डुकरे इत्यादींचा सुळसुळाट झाला असल्याने वॉर्डातील नागरीक अत्यंत त्रस्त झाले असलेबाबत मुद्दा उपस्थित करुन पशुवैदयकीय विभागाचे कामकाजाबाबत नाराजी व्यक्त केली असता मा. सभापती यांनी पशुवैदयकीय विभागाचे अधिकारी डॉ. सतिश गोरे याच महिन्यात सेवानिवृत्त होत आहेत त्यामुळे या संदर्भात मा. आयुक्त सो. यांचेकडे सविस्तर बैठक घेण्यात येईल. कारण डुकरे पाळणा-या मालकांचा शोध घेऊन त्यांचेवर कारवाई केल्याशिवाय या समस्येचे निराकरण होणार नाही तसेच सर्व वॉर्ड कचराकुंडी विरहीत केल्यास हॉटेल चालकांकडील हॉटेलवेस्ट कुंडयामध्ये टाकले जाणार नाही. असे सांगणेत आले.

- मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांनी दि. 15/12/2017 रोजी सकाळी 8 ते 11 या वेळेत शाहूनगर येथे विशेष स्वच्छता मोहीम राबविणेत येणार असून त्याची सुरुवात अष्टविनायक मंदीरापासून होणार आहे. या मोहिमेसाठी सर्व पदाधिकारी, अधिकारी, मोरवाडी/कासारवाडी आयटीआयचे विदयार्थी सहभागी होणार आहेत. तरी अ क्षेत्रीय कार्यालयामधील सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी देखील या विशेष स्वच्छता मोहिमेमध्ये सहभागी होणेबाबत सुचना दिल्या.

- सहा. आरोग्याधिकारी, श्री महादेव शिंदे यांनी दि. 4 जानेवारी ते 6 जानेवारी 2018 दरम्यान **स्वच्छ भारत सर्व्हेक्षण 2018 च्या स्पर्धा सुरु होत आहेत.** या स्पर्धेमध्ये या वर्षी एकूण चार हजार शहरांनी सहभाग घेतला आहे. महापालिकेने स्वच्छता अपच्या माध्यमातून सुरु केलेल्या ऍपमध्ये नागरीकांना आरोग्य् विषयक सर्व तक्रारी दाखल करता येणार आहेत. हे अप सर्वांनी आपल्या मोबाईलमध्ये डाऊनलोड करणेचे आवाहन केले. तसेच महापौर सो. मा. आयुक्त सो यासंदर्भात प्रेस कॉन्फरन्स देखील घेणार असल्याचे सांगितले. मा. सभापती यांनी पिंपरी चिंचवड शहराच्या औदयोगिक नगरीमध्ये, कंपन्यामध्ये याबाबतीत प्रसिध्दी दिल्यास ब-याच कामगारांच्या मोबाईलमध्ये हा अप डाऊनलोड करता येईल असे सुचविले:

- सहा. आरोग्याधिकारी, श्री महादेव शिंदे यांनी दि. 17/12/2017 रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पर्यावरण संवर्धन समिती यांचे संयुक्त विदयमाने ई वेस्ट संकलन महा अभियान राबविणेत येणार आहे. याकरीता पिंपरी चिंचवडमध्ये 112 ठिकाणे निश्चित करणेत आली आहेत. अ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत एकूण 14 ठिकाणामधून ई वेस्ट संकलीत केले जाणार आहे. या 14 ठिकाणांची यादी तसेच या अभियानासंबंधीचे प्रसिध्दीपत्रे/हॅंडबिले आजच सर्वत्र वाटप करणेत येणार आहेत. सन्मा. सदस्यांनी वॉर्डामधील नागरीकांना यासंबंधीची माहिती देणेकामी आवाहन केले.

- सन्मा. सदस्य राजू मिसाळ यांनी वॉर्डमधील एलईडी दिव्यांबाबत विचारणा केली असता संबंधित कार्यकारी अभियंता, विदयुत यांनी वॉर्ड क्रमांक 15 साठी एकूण 300 एलईडी दिवे बसविणेत येणार असल्याचे सांगितले. सदर दिव्यांची संख्या अतिशय कमी असल्याने याबाबत सविस्तर माहिती विदयुत विभागामार्फत देण्याची मागणी करण्यात आली.
- सन्मा. सदस्या श्रीम शर्मिला बाबर यांनी मागणी केलेनुसार त्यांचे प्रभागामध्ये विस्कळीत झालेला पाणीपुरवठा सुरळीत करणेसाठी पाणीपुरवठा विभागामार्फत कार्यवाही करावी तसेच प्रभागातील डुकरांचा त्रास कमी करणेसाठी पशुवैदयकीय विभागामार्फत उपाय योजना कराव्यात.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी / अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

[ केशव हनुमंत घोळवे ]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्र. अक्षेका/11/कावि/1320/2017
दिनांक 19/12/2017

प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती,
निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित